# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.०५ दिनांक १३/०१/२०२१

## पालघर येथील श्री अष्टविनायक पतसंस्थेमध्ये झालेल्या खुनाच्या गुन्हयाची उकल करण्यात पालघर पोलीसांना यश

पालघर शहरातील ओम शांती देवा अपार्टमेंट मधील रुम नं. ११ येथे श्री अष्टविनायक नागरी सहकारी पतसंस्था सन २००६ पासून सुरु आहे. सदर पतसंस्थेत. दि.०९/०१/२०२१ रोजी सायंकाळी १७.१५ वा.ते २०.३० वा.चे सुमारास मयत महिला वय ५७ वर्षे या पतसंस्थेच्या कार्यालयात दैनंदिन कामकाज पाहत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन त्यांचे डोकीत कोणत्यातरी हत्याराने वार करुन जीवे ठार मारल्याने याबाबत पालघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.०८/२०२० भा.दं.वि.स.क. ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर घटनेची माहीती प्राप्त होताच तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी, पालघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा.डी.एस.पाटील व स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी पोलीस पथकासह भेट दिली. घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. गुन्हयात अज्ञात आरोपीने कोणताही पुरावा मागे सोडला नव्हता. घटनास्थळावरील परिस्थिती व तांत्रिक तपास याचे मदतीने संशयीत इसम वय ३७ वर्ष याचेकडे चौकशी केली. त्याने दिनांक ०९/०१/२०२१ रोजी सायंकाळी १७.३० वा.चे सुमारास मयत या एकट्या पतसंस्थेच्या कार्यालयात असतांना आरोपीत याने लोखंडी हातोडा घेवून मयत हिचे डोकीत मारुन त्यांना गंभीर दुखापती करुन जीवे ठार मारल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

गुन्हयाचा पुढील तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग अतिरिक्त कार्यभार पालघर विभाग श्री. प्रशांत परदेशी, हे करीत आहेत.

वरील कामगिरी पोलीस अधीक्षक, पालघर मा.श्री.दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. प्रकाश गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. प्रशांत परदेशी, उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग अतिरिक्त कार्यभार पालघर विभाग, पोलीस निरीक्षक श्री. डी.एस.पाटील, पालघर पोलीस ठाणे, सहा.पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र पारखे, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, सहा. पोलीस निरीक्षक श्री.श्रीकांत कोळी, मनोर पोलीस ठाणे तसेच पालघर पोलीस ठाणेचे व स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिटचे पोलीस अंमलदार यांनी पार पाडली आहे.

Scanned with CamScanner